

(10)

आज़ादी का
अमृत महोत्सव

Vidarbha Youth Welfare Society, Amravati's

# INDIRABAI MEGHE MAHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI

Irwin Square, Morshi Road, Amravati

## *One Day Interdisciplinary National Conference*

This is to certify that

Mr./Mrs./Prof./Dr. Kavita R. Borkar

of Dr M. K. Umathe College, Nagpur

has Participated in One Day Interdisciplinary National Conference on " Women's Contribution to Modern Indian Society " held on 7th of November, 2022.

He/She Chaired a session on —

Presented Paper entitled सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदान.

Choudhary
Dr. Punam Y. Choudhary
**Convener**

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

Dr. Leena S. Kandalkar
**Principal**

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 373 A (CCCLXXIII)

ISSN : 2278-9308 November, 2022

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | स्त्रीवाद, स्त्रीवादी साहित्य : समिक्षा आणि वास्तव | अभिजीत झाडे | 1 |
| 2 | पंचायत राज संस्थांमधील महिला प्रतिनिधींचे सक्षमीकरण | डॉ. एच. पी. पारधी | 6 |
| 3 | भारतीय राजपूत विधवा महिलांची मध्ययुगकालीन व आधुनिक काळातील स्थिती | डॉ.अस्मिता ठोंबरे | 12 |
| 4 | भारतीय स्त्री जीवनाचे अध्ययन | प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे | 15 |
| 5 | कॉन्ट्रीब्युशन ऑफ ॲनी बेझंट फॉर मेकिंग मॉडर्न इंडिया | प्रा.डॉ.दिलीप तुकाराम कदम | 20 |
| 6 | महिला सक्षमीकरण संकल्पना व महत्व | प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे | 24 |
| 7 | स्त्रीयांची आधुनिकतेकडे वाटचाल एक अन्वेषण | प्रा. सौ. प्रिया खोरगडे | 27 |
| 8 | आदिवासी स्त्रियांचे स्थान आणि समस्या | प्रा. डॉ. दयाश्री वि.कोकाटे | 29 |
| 9 | सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदान | डॉ. कविता आर. बोरकर | 31 |
| 10 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील योगदान | पी. डब्ल्यु. पाटील | 36 |
| 11 | महिला सबळीकरणाकरिता राष्ट्रीय मिशन | प्रा.डॉ. रमेश के. शेंडे | 40 |
| 12 | श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी स्त्री विकासासाठी केलेले कार्य एक अभ्यास | कु.गायत्री जवाहरलाल तेली , डॉ.मनीषा जगदीशलाल वर्मा | 44 |
| 13 | भारतीय महिलांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान | प्रा. डॉ. प्रफुल इ.ढोके | 48 |
| 14 | महिला सक्षमीकरणातील समाज सुधारकांचे योगदान | डॉ. वनिता न्या चोरे , उज्वला बाबुराव पवार | 53 |
| 15 | अमरावती जिल्ह्यातील जलव्यवस्थापनाचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम | डॉ. प्रा. लिना कांडलकर , कु. मेघा तेलखडे | 58 |
| 16 | भारतीय राजकारणात महिलांची भूमिका | कुणाल दिलीप राठोड | 64 |
| 17 | राष्ट्र सेविका समितीचे महिला सावलीकरनातील योगदान | देविदास गुलाब चौधरी , प्रा.डॉ.धनंजय र.चौधरी | 68 |





Scanned with OKEN Scanner

**Impact Factor-8575 (SJIF)**

**ISSN-2278-9308**

ISSUE No - (CCCLXXIII) 373-A

November-2022

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

*Vidharbha Youth Welfare Society, Amravati's*

## INDIRABAI MEGHE MAHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI

**AND**

## AADHAR SOCIAL RESEARCH, DEVELOPMENT AND TRAINING INSTITUTE, AMRAVATI

**ORGANIZE**

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

**ON**

## WOMEN'S CONTRIBUTION TO MODERN INDIAN SOCIETY

**Date : 7th of November, 2022**



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr.Leena Kandlkar
**Principal**
Indirabai Meghe
Mahila Mahavidyalaya.
Amravati. Maharashtra

**Editor**
Prof. Dr. Punam Choudhary
Convner
Indirabai Meghe
Mahila Mahavidyalaya.
Amravati. Maharashtra

Aadhar Publications

For Details Visit To :

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Impact Factor-8575 (SJIF) ISSN-2278-9308
ISSUE No - (CCCLXXIII) 373-A November-2022

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed
Multidisciplinary International Research Journal

*Vidharbha Youth Welfare Society, Amravati's*

## INDIRABAI MEGHE MAHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI

AND

## AADHAR SOCIAL RESEARCH, DEVELOPMENT AND TRAINING INSTITUTE, AMRAVATI

ORGANIZE

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

ON

## WOMEN'S CONTRIBUTION TO MODERN INDIAN SOCIETY

Date : 7th of November, 2022



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr.Leena Kandlkar
Principal
Indirabai Meghe Mahila Mahavidyalaya. Amravati. Maharashtra

**Editor**
Prof. Dr. Punam Choudhary
Convner
Indirabai Meghe Mahila Mahavidyalaya. Amravati. Maharashtra

For Details Visit To : www.aadharsocial.com
Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 373 A (CCCLXXIII)
ISSN : 2278-9308
November, 2022

# Power of Women in Socio-Economic and Political Life
# सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदान

डॉ. कविता आर. बोरकर
सहयोगी प्राध्यापक गृहअर्थशास्त्र विभाग डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, भामटी, रिंग रोड, नागपूर २२.
मो. : ९७३०५३८८८२,Email :- kavitaborkar52@gmail.com

मानवी समाजरचनेत स्त्री व पुरूष यांचा सगावेश असून पुरूष व महिला या दोघांचीही निश्चित अशी भूमिका असते. देशाच्या एकूण लोकसंख्येत महिलांचे प्रमाण सुमारे ४८% आहे. याचा अर्थ भारताच्या मानवी भांडवलात महिलांचा हिस्सा जवळजवळ पुरूषांइतका आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात महिलांची भूमिका महत्वपूर्ण आहे. परंतु, भारतीय समाजात पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे पुरूषांच्या बरोबरीने स्थान, दर्जा दिला जात नाही. परंतु, कोणतेही राष्ट्र आर्थिक प्रगती साधत असतांना महिलांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. महिलांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेतल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. या अनुषंगाने महिला सक्षमीकरणाला चालना मिळाली.

भारतीय घटनेने समानतेचा मुलभूत अधिकार भारतीय नागरिकांना प्रदान केला आहे. भारतीय समाजात स्त्री आणि पुरूषांमध्ये भेदभाव केला जात असे. मुलगा हा वंशाचा दिवा त्याच्या जन्माने कुटूंबाला मोक्ष प्राप्त होतो असा खुळा समज समाजात रूढ होता, आज ही आहे. त्यामुळेच मुलींकडे अगदी दुय्यम नजरेने पाहिजे जात असे. आजच्या वैज्ञानिक तांत्रिक आणि यांत्रिक युगातही स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळीसारख्या घटना समाजात घडत असतांना दिसतात.

**महिलांचे सामाजिक योगदान :—**

स्त्री आणि पुरूष ही संसाराची दोन टोके आहेत असा सर्वसामान्य समज भारतीय समाजात रूढ आहे. संसाराचा रथ व्यवस्थित चालावा असे वाटल्यास दोन्ही चाकांना समान ठेवणे आवश्यक आहे. परंतु, स्त्रीने नेहमीच पुरूषामागून चालावे, तिने चूल आणि मूल यापुरतेच सीमित रहावे, तीने आपली मतही मांडू नये अशीच अपेक्षा तिच्याकडून केली जाई आणि ती आपल्या भूमिकशी कायम राहावी म्हणून तिला अशिक्षित व आर्थिक दुष्ट्या दुर्बलही ठेवले जाई.

आज सामाजिक जीवनात स्त्रीयांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले असून कुटूंबात पत्नी म्हणून सन्मानाने जगता यावे यासाठी ४९८ब सारखे कायदे अंमलात आले. श्रीमती लक्ष्मी मेणन यांनी महिलांचे अधिकार आणि सामाजिक स्तर उंचावण्यासाठी प्रशंसनीय कार्य केले. आता महिलांचा कौटुंबिक जीवनात छळ थांबला आहे. पुरूष वर्ग तिला सन्मानजनक वर्तणूक देत आहे. अनेक सामाजिक कार्यात स्त्रीयांचा सहभाग वाढत आहे. मदर टेरेसा, शोभा डे, मुक्ती दत्ता, [illegible]वाड्याच्या सुकन्या सिंधुताई सपकाळ यांना आपण आज अनाथांची आई म्हणून ओळखतो. अशा बऱ्याच स्त्रियांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक कार्यात व्यतीत केले आहे. म्हणून एक [illegible]य सन्मानाचे स्थान स्त्रियांना मिळाले.

कोणत्याही समाजात स्त्री व पुरूषांना समान अधिकार प्राप्त होणे, स्त्रियांना शिक्षणाचा मुलभूत अधिकार मिळणे, स्त्रियांना आर्थिक, सामाजिक व आध्यात्मिक विषयांवर स्वत:चे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य मिळणे. स्त्रीने मांडलेल्या विचारांशी कुटूंब, समाज यांची समंती असली पाहिजे अशी परिस्थिती निर्माण झाली तर स्त्री सबलीकरण झाले असे म्हणता येई. स्त्री सबलीकरण झाले असे म्हणता येईल. स्त्री सबलीकरण करणाऱ्या संकल्पनेनुसार स्त्रीला जर सर्व प्रकारचे स्वातंत्र्य मिळाले तर ती स्वत:चाच नव्हे तर संपूर्ण कुटूंबाचा विकास करू शकते. अनेक कुटूंबाचा विकास करू शकते. अनेक कुटूंबाचा विकास झाला तर संपूर्ण समाजाचा विकास हा अनिश्चितच घडून येतो. समाज विकसित असेल तर राष्ट्र विकसित होते.

सामाजिक दुष्टिने महिला सबलीकरण हा विषय अभ्यासल्यास असे दिसून येते की, [illegible] समाजामध्ये स्त्री व पुरूष हे समान आहेत ही भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल. [illegible] स्त्री व पुरूष समानता आली तर समाजातील कुटूंबव्यवस्था ही जास्त बळकट होईल.

हुंडाबळी, बालविवाह, हुंडाबळी इत्यादी प्रचलित पद्धतीचा ऱ्हास होईल. स्त्रियांना आध्यात्मिक कार्यात सक्रीय भाग घेता येईल. आईवडिलांच्या अंतिम संस्काराचा हक्क मुलाप्रमाणे मुलीला मिळेल. कुटूंबात मुलगा व मुलगी यांना समान वागणूक मिळेल. मुलगा किंवा मुलगी ह्या नवजात अपत्याचे स्वागत समाजाकडून आनंदाने होईल. स्त्री लिंग परीक्षणाची गरज भासणार नाही. कुटूंबातील तिचे स्थान दुय्यम न राहता ते बरोबरीचे राहिल अशा समाजात सामाजिक दृष्टीने स्त्री सबलीकरण झाले असे म्हणता येईल.

कुटूंबात स्त्रीचा दर्जा उंचावलेला दिसून येतो अनेक कुटूंबामध्ये स्त्रीच्या बरोबरीने पुरूष घरकामात हातभार लावू लागेल. विशेषत: नोकरी करणाऱ्या स्त्रियांना मंडळीचे सहकार्य मिळू लागले. समाजामध्ये देखिल विधवाविवाह, हुंडाविरोधी आंदोलने यामध्ये स्त्रीयांना पुरूषांचा पुढाकार ही मोठी उपलब्धी मानली जाते.

**महिलांचे आर्थिक योगदान :**

प्राचीन काळापासून अर्थाजनापासून वंचित असलेली आजची भारतीय नारी ही प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान देऊन पुरूषांप्रमाणेच अर्थाजन करीत आहे. प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापिका, डॉक्टर, इंजिनीअर, पायलट, नर्सिंग, खासदार, आमदार, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, राष्ट्रपती इतकेच नव्हे तर अंतराळवीर म्हणून तिची कर्तुत्वाची झेप आकाशाला पार करून पुढे गेली आहे. प्रभा माथूर या पहिल्या महिला पायलट झाल्या. त्यावरून त्यांनी सिध्द केले की महिला कुठल्याच दृष्टिकोनातून पुरूषांपेक्षा कमी नाही. आज यशस्वी उद्योजिका म्हणून अनेक स्त्रीया नावारूपास आलेल्या आहेत. महिलांचा मोठा दबदबा निर्माण झाला आहे.

स्त्रियांच्या आर्थिक आलेख बघायचा झाल्यास या दृष्टिने आपल्याला दोन ध्रुवांचे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. एकीकडे प्रचंड गरिबी तर दुसरीकडे प्रचंड श्रीमंती असल्याचे दिसते. या दोघांच्या मध्ये मध्यमवर्गीय स्त्रिया आहेत. ह्या तीनही वर्गात स्त्रियांचे आर्थिक शोषण होतांना दिसते. यासोबतच कायद्याने स्त्रियांना संरक्षण दिल्यामुळे मोठ्या आर्थिक गटातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम होतांना दिसतात. कायद्यालापण पळवाटा असतात हे सुध्दा या निमित्ताने विचारात घेणे गरजेचे आहे.

शिक्षीत व उच्च शिक्षित महिलांना अर्थाजनाची संधी मिळाल्यास पुरूषाप्रमाणे समान वेतन मिळते. परंतु, अल्पप्रमाणात स्त्रियांना संधी मिळते. मात्र ग्रामीण भागातील अशिक्षित स्त्रियांना एकाच कामासाठी पुरूष व स्त्रियांना समान वेतन मिळत नाही. कारण ती शारीरिकदृष्ट्या कमजोर समजल्या जाते व ती पुरूषांबरोबरीने काम करू शकत नाही. शिक्षण नसल्यामुळे एक तर तिची फसगत होते.

स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान बदलण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे हत्यार आहे. १९८८—८९ जागतिक अहवालानुसार स्त्री शिक्षण आर्थिक कौटूंबिक, सामाजिक, राजकीय निर्णय क्षमता अंगी बाणते, प्रजनन, बालकांचे, संगोपन, माता व अपत्याचे आरोग्य आहार या करिता सहाय्यक असते. शिक्षणामुळे स्त्रियांच्या सुप्त गुणांचा विकास होतो. व त्यांच्या व्यक्तिमत्वाला नविन आकार मिळतो. नव्या युगाशी जुळवून घेण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. शिक्षणाच्या वर्गीकरणावरून असे आढळून आले की, बालकांचा विकास शिक्षण आणि स्वास्थ राखण्यास महिलांना अधिकार शिक्षण असणे गरजेचे आहे. स्त्रियांना असे शिक्षण दिले पाहिजे की, त्यायोगे त्यांना स्वातंत्र्य, बौद्धिकस्तर लाभेल, स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतील, त्यात त्यांना हक्काची जाणिव होईल, विवाहपूर्वी स्त्रीला स्वत:च्या पायावर उभे राहण्याइतपत शिक्षण मिळाले पाहिजे. शहरीभागात मुलींना उच्च शिक्षणही मिळत आहे. परंतु, ग्रामीण भागात आर्थिक परिस्थितीमुळे पालक आपल्या मुलींना उच्च शिक्षण देऊ शकत नाही. पहाडी भागात राहणाऱ्या महिलांना तर शिक्षण माहितीच नाही. अशा स्त्रियांना—मुलींना शिक्षण प्रवाहात आणणे गरजेचे आहे. तरच सक्षमीकरण काही अंशी पूर्ण झाल्याचे समाधान होईल.

महिलांना मानाचे स्थान मिळावे तसेच त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या उद्देशाने राज्याने महिला धोरण तयार केले. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच निर्णय प्रक्रियेत सर्वच स्तरावर त्यांचा सहभाग राहावा असा दृष्टिकोन यापाठीमागचा आहे. महिला व बालविकास विभागतर्फे विविध योजना तयार करण्यात आल्या.



Scanned with OKEN Scanner

१) महिला स्वयं सहाय्यता बचत गट
२) सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्रे
३) कामधेनू योजना

मुलींना शिक्षणाचे दालन खुली करून देण्यात आले असून १२ वी पर्यंत मोफत शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षणात प्राध्यान्य देतांना ३०% आरक्षणाचा कोटा देण्यात आला. राज्यात ५३ हजाराहून अधिक महिला स्वयंसहाय्यता बचत गट राज्यातील ३२३ तालुक्यातील १३ हजाराहून अधिक गावात स्थापन केले आहेत. या योजने अंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागामध्ये महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री आणि त्यांना रोजगार देण्याचे काम करण्यात येते.

सन १९९२ पासून भारतात महिला बचत गटाच्या चळवळीला चालना मिळाली. महिला बचत गटामध्ये काही महिला एकत्र येऊन एक बचत गट स्थापन करतात व या गटाचे बँकेत खाते उघडतात. दरमहा विशिष्ट रक्कम सर्व महिला बँकेच्या खात्यात जमा करतात. शासनाने बचत गटाच्या चळवळींना चालना देण्यासाठी बँकेद्वारे बचत गटांना कर्ज उपलब्ध करून देणे, कर्जावर अनुदान देणे अशाप्रकारे प्रयत्न करून महिलांना उद्योग व्यवसायात प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भारतात आज लाखो बचत गटांच्या माध्यमातून महिला उद्योग व्यवसायात सक्रिय झाल्या आहेत.

**महिलांचे राजकीय योगदान :—**

स्वातंत्र्यप्राप्तीपासून अनेक भारतीय महिला महत्वाच्ये राजकीय पद धारण करू लागल्या आहे. इंदिरा गांधी, सरोजनी नायडू पासून शीला दिक्षीत, मायावती, सुषमा स्वराज, जयललिता, सोनिया गांधी आदि महिला राजकीय क्षेत्रात आपल्या तेजस्वी कर्तृत्वाने राजकीय क्षेत्र प्रमाणांकित करित आहे. आज पन्नास टक्के महिला आरक्षणाने स्थानिक राजकीय व्यवस्था महिला वर्गाच्या हाती सुपूर्द झाली आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रात महिलांची उत्तुंग झेप ही महत्वपूर्ण ठरली आहे.

स्त्रियांसाठी शिक्षणाची क्रांती केली नसती तर आज स्त्रियांची प्रगती आपणास दिसली नसती, म्हणून म्हणतात की, एका मुलीला शिकवणे म्हणजे संपूर्ण कुटूंबाला शिकविण्यासारखे आहे. त्यामुळे पूर्ण घराचा विकास होतो. नंतर समाजाचा आणि त्यावरून देशाचा विकास होतो म्हणून जर देशाचा विकास घडवायचा असेल तर स्त्री शिक्षणाची अत्यंत गरज आहे. शिक्षण ह्या जादूच्या कांडीने सोडवली जाणार नाही अशी एक समस्या नाही. त्यासाठी समाजाच्या स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. कारण भारताच्या पूर्वीच्या स्त्री शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| जनगणना वर्ष | एकूण साक्षरता दर | महिला साक्षरता दर | जनगणना वर्ष | एकूण साक्षरता दर | महिला साक्षरता दर |
|---|---|---|---|---|---|
| १९०१ | ५.३५ | ०.६० | १९६१ | २९.३४ | १२.९५ |
| १९११ | ५.३५ | १.०५ | १९७१ | ३६.३१ | १८.६९ |
| १९२१ | ७.१६ | १.८१ | १९८१ | ४३.५६ | २४.८९ |
| १९३१ | ९.५० | २.७३ | १९९१ | ५२.११ | ३९.४२ |
| १९४१ | १६.३७ | ७.३० | २००१ | ६४.८४ | ५३.६७ |
| १९५१ | २४.०० | ७.७८ | २०११ | ७४.०४ | ६५.४६ |

२०११ ची सर्वात उल्लेखनीय बाब अशी की स्त्रियांच्या साक्षरता दर हा ११.८ ने वाढलेली दिसते. तर पुरूषांमध्ये फक्त ६.९ ने आढळला. यावरून असे लक्षात येते की, स्त्रियांच्या शिक्षण घेण्याच्या प्रमाणात पुरूषांपेक्षा लक्षणीय वाढ झालेली आहे.

देशातील स्त्रियांचा देशाच्या विकासासाठी फार मोठा वाटा असतो. त्या देशाचा विकास घडवून आणू शकतात फक्त त्यांना त्यांच्यामधिल सुप्तगुणांची शक्ती जाणीव होण्याची गरज असते. ती जाणीव होण्यासाठीच शिक्षणाची गरज आहे. त्यासाठी स्त्री शिक्षणाचे महत्व समजून घेऊन देशातील प्रत्येक स्त्रिला शिक्षण घेण्यास प्रवृत्त करायला हवे आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रातही काम करणे गरजेचे आहे.



Scanned with OKEN Scanner

आज स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांमध्ये देशभरात सुमारे ३३ लाख सदस्य आहे. त्यात ११ लाख सदस्या आहेत. महाराष्ट्रात २७८९६ ग्रामपंचायतीमध्ये ७४२६० महिला सदस्य आहे. त्यात ९२९७ महिला सरपंच आहेत. ३५१ पंचायत समित्यामध्ये १३०७ महिला सदस्य असून पंचायत समितीच्या ११७ महिला सभापती पदावर विराजमान झाल्या आहेत. ३३ जिल्हा परिषदांमध्ये ६५४ महिला सदस्य असून ३३ पैकी ११ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदावर आज आरूढ झालेल्या आपल्याला दिसत आहेत.

थोडक्यात आज अनेक सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात महिला आघाडीवर दिसत आहेत. १२ वी परीक्षमध्ये मेरीट मध्ये येण्याची संख्या मुलींची जासत आहे. तर प्रधानमंत्री, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, द्रौपदी मुर्मु, कल्पना चावला, किरण बेदी अशा अनेक स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वावर पदभार स्वीकारला आहे. हे परिवर्तन लक्षात घेतले तर येणारा कालखंड हा महिलांचाच आहे असे मला वाटते.

राजकीय क्षेत्रात काही बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया आपले कर्तृत्व गाजवित असतांना दुसरीकडे राजकारण हे स्त्रियांचे क्षेत्र नाही, ही पुरूषी मानसिकता आजही प्रबळपणे सर्वत्र आहे. स्त्रीला राजकारणात ३३ टक्के आरक्षण देण्यात यावे की नाही यावर अजूनही काथ्याकूट सुरूच आहे. मागील पाच—सात वर्षात राजकीय क्षेत्रात काही आमुलाग्र बदल झाले. ग्रामपंचायत पासून ते विधानभवापर्यंत स्त्रियांना राजकीय आखाड्यात शिरण्याची संधी मिळाली. मात्र तिला खुर्चीतच बंदीस्त रहावे लागत आहे. सत्ता चालविणारे पुरूषच आहेत. हा पायंडा मोडून काढण्याचे आव्हान आजच्या स्त्री समोर आहे. पुढील आकडेवारी राजकीय स्त्रियांची पिछाडी दर्शविते. १९९९ च्या आकडेवारीनुसार लोकसभेत ५४३ पैकी केवळ ४३ महिला खासदार होत्या. म्हणजेच केवळ ७.२ टक्के स्त्रियाच देशातील ५० टक्के स्त्रियांचे प्रतिनिधीत्व करतात. राज्यसभेत २३७ पैकी केवळ २२ खासदार होत्या.

**सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टीने महिला योगदानाचे यश :—**

➢ सामाजिक दृष्टिने यशप्राप्ती : कुटूंबात स्त्रीचा दर्जा उंचावलेला दिसून येतो. अनेक कुटूंबामध्ये स्त्रीच्या बरोबरीने पुरूष घरकामात हातभार लावू लागले. विशेषत: नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरातील मंडळींचे सहकार्य मिळू लागले. समाजामध्येदेखील विधवाविवाह, हुंडाविरोधी आंदोलने, स्त्री सबलीकरणाकरिता पुरूषांचा पुढाकार ही मोठी उपलब्धी मानली जाते.

➢ आर्थिक दृष्टीने यशप्राप्ती : आज विविध क्षेत्रात जसे शैक्षणिक, संशोधन, तांत्रिक, अवकाश, बँकिंग, विमा, जाहिरात, कला इत्यादी अनेक क्षेत्रात स्त्रियांना रोजगार मिळाले. अनेक मोठ्या व जबाबदारीच्या पदावर स्त्री कार्यरत आहे. आर्थिक दृष्ट्या ती स्वावलंबी बनली आहे.

➢ राजकीय दृष्टीने यशप्राप्ती : स्त्रियांना राजकारणात ३३ टक्के जागा राखीव दिल्यामुळे शहरात नव्हे तर खेड्यात देखील सरपंच, सभापती तसेच आमदार, खासदार म्हणून स्त्रिया कार्यरत आहेत. स्त्री सबलीकरण झाले, स्त्रिला स्वातंत्र्य मिळाले, अर्थाजन मिळाले. समाजाने स्त्रीला मानसन्मान दिले याची अनेक उदा. देता येतील. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, तांत्रिक क्षेत्र, संशोधन क्षेत्र, अवकाशात देखील स्त्रीने भरारी घेतली आहे. तरीही कुठेतरी असे वाटते की, स्त्रीचे सबलीकरण झाले मग महिलांचे शोषण, फसवणूक अत्याचार ह्या गोष्टी अजूनही रोज घडतात आहे. तेव्हा स्त्री सबलीकरणाचे सुंदर चित्र हा भास वाटतो.

**सारांश :**

आज वेगवेगळ्या क्षेत्रात आत्मविश्वासाने, जिद्दीने कार्य करणाऱ्या स्त्रिया बघितल्या की स्त्रीप्रश्न संपलेत कां? असा प्रश्न निर्माण होतो, मात्र वस्तुस्थिती पुन्हा स्त्री प्रश्नाकडे आकर्षित व्हायला भाग पाडते. वर्तमानपत्रात दैनंदिन येणाऱ्या स्त्री प्रश्नांविषयी बातम्या वाचून घरात, समाजात महिलांचा होणारा नैतिक छळ, शारीरिक सुरक्षिततेची भीती या सर्व बाबींमुळे स्त्री प्रगतीचे, महिलांच्या स्वयंपूर्णतेचे चित्र एक सत्य नसून भास वाटू लागतो. एका बाजून महिला सबलीकरणाच्या नावाखाली शासन, समाज व विविध महिला संघटनांद्वारे होणारे प्रयत्न व त्या प्रयत्नांची फलश्रुती यांचे मापन केले तर काय खरे व काय खोटे हे सांगणे कठीण होऊन जाते.

स्त्री सबलीकरण झाले. स्त्रीला स्वातंत्र्य मिळाले, अर्थाजन मिळाले, समाजाने स्त्रीला मानसन्मान दिले याची अनेक उदा. देता येतील. राजकारण, अर्थकारण, तांत्रिक क्षेत्र, संशोधन क्षेत्र,



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
November, 2022

अवकाशात देखिल स्त्रीने भरारी घेतली आहे. तरीही कुठेतरी असे वाटते की, स्त्रीचे सबलीकरण झाले. मग महिलांचे शोषण, फसवणूक, अत्याचार ह्या गोष्टी अजूनही रोज घडतात तेव्हा स्त्री सबलीकरणाचे सुंदर चित्र हा भास वाटतो.

संदर्भ :—

१) साने गीता (१९९७), भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशनगृह, खटाववाडी, गिरगाव, मंबई
२) डॉ. मंदाकिनी गातीली (२००९), स्त्रीप्रश्न सोडवतांना, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. शनिवारपेठ, पुणे
३) कुळकर्णी अंजली (२०१०), स्त्री स्वत्वाचा शोध, आकांक्षा प्रकाशन, नागपूर
४) डॉ. गोऱ्हे निलम (२००९), स्त्री प्रश्नांचा वेध, पद्मगंगा प्रकाशन, पुणे
५) महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास, नवे दालन नव्या संधी, प्रा. शमसुद्दीन तांबोळी
६) भारतातील महिला विकासाची वाटचाल, ज.श. आपटे, पुष्पा रोड,
७) प्रतिबिंब महिला समस्यांचा आत्मशोध, संपादक— डॉ भुसारी, डॉ पोच्छी, डॉ निकम



Scanned with OKEN Scanner